0 4 MAR 2021 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारणा बझार आदर्श मॉडेल : डॉ. शिर्के

सकाळ वृत्तसेवा

वारणानगर, ता. ३ : सहकारमहर्षी तात्यासाहेबांनी सुरू केलेल्या वारणा बझारकडे आदर्श मॉडेल म्हणून पाहिले जाते, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

येथील वारणा बझार आणि विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन विस्तार व विभागाच्या मान्यतेने आयोजित विक्रेता प्रशिक्षण वर्गाच्या २६ व्या बॅचचे उद्‍घाटन व २५ व्या बॅचच्या सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वारणा दूध संघाचे कार्यकारी संचालक मोहन येडूरकर होते. २५ व्या बॅचच्या विक्रेता प्रशिक्षण वर्गात निशिकांत जाधव (बहिरेवाडी ) याने प्रथम पटकवला. वैष्णवी यादवने दुसरा तर सरिता मोरे हिने तिसरा क्रमांक मिळविला. विजेत्यांना डॉ. शिर्के व येडूरकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.



वारणानगर : विलासराव तात्यासो कोरे कंझ्यु. को-ऑप. ट्रेनिंग सेंटरचे विजेते निशिकांत जाधव यांना प्रमाणपत्र देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मोहन येडूरकर, डॉ. ए. एम. गुरव, अमरसिंह माने, सुभाष देसाई, शरद महाजन, विश्वनाथ पाटील आदी.

येडूरकर, शेतकरी सहकारी संघाचे अध्यक्ष अमरसिंह माने यांनी मनोगत व्यक्त केले. उपाध्यक्ष सुभाष देसाई, विभागाचे प्रभारी संचालक डॉ. ए. एम. गुरव, संचालक मोहनराव आजमने, राजाभाऊ गुरव, प्रभारी प्राचार्य प्रकाश चिकुर्डेकर, प्रा. एस. व्ही. पोवार, प्रा. डी. एस. पोवार, प्रा. डी. एस. गुरव, प्रा. सी. आर. जाधव, डॉ. एन. ए. पाटील, अरुणा गुरव, शिवाजी पाटील, दिलीप पाटील उपस्थित होते. सरव्यवस्थापक शरद महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा.पी. बी. बंडगर यांनी सूत्रसंचालन केले. संचालक विश्वनाथ पाटील यांनी आभार मानले.

0 4 MAR 2021

**तरूण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा सॅटर्डे क्लबबरोबर सामंजस्य करार

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळणार उद्योग-व्यवसायाबाबत मार्गदर्शन

प्रतिनिधी
कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट मुंबई व शिवाजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत ग्रामिण भागातील युवकांना उद्योजक बनविण्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व संशोधन करण्यासाठी या करारामुळे मदत होणार आहे. तसेच उद्योगनिर्मिती क्षेत्रातील संशोधनाला चालना देण्यासाठी हा सामंज्यस्य करार उपयुक्त आहे. उद्योजकांना खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत टिकाव धरण्यासाठी नव नवे तंत्रज्ञान आत्मसात करून त्यांच्यापर्यंत पोहचविणे, कच्च्या मालापासून दर्जेदार उत्पादनाची निर्मिती करणे, देशांतर्गत व देशाबाहेरील नवीन उद्योजक, तंत्रज्ञ व तंत्रज्ञान निर्माण करणे हा सामज्यंस कराराचा मुख्य उद्देश आहे. याच बरोबर या दोन्ही संस्थाच्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यापीठे, महाविद्यालये, परीसंस्था यांचेबरोबर संयुक्त पदवी कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट मुंबई चे सेक्रेटरी जनरल मांजरेकर, हर्षवर्धन भुरके विद्यापीठ परीक्षेत्रातील उद्योजक, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. गुरव यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.



**कोल्हापूर : सामंज्यस्य कराराप्रसंगी कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट मुंबई चे सेक्रेटरी जनरल प्रदिप मांजरेकर.**

तरूण भारत

# परदेशातील करिअर संधीवर विद्यापीठात कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापक करिअर संधी उपलब्ध आहेत. त्या संधींची माहिती घेऊन त्यांचा लाभ घेण्याची मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

विद्यापीठाच्या इंटरनॅशनल अफेअर्स सेल आणि रसायनशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात पीएच. डी. संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'परदेशातील संशोधनविषयक करिअर संधी" या विषयावरील आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, आपल्या संशोधनाची सांगड जागतिक स्तरावरील संशोधनाशी सांगड घातली पाहिजे.

डॉ. एस. डी. डेळेकर यांनी परदेशात उपलब्ध फेलोशिपविषयी माहिती दिली. इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे समन्वयक डॉ. घुले यांनी सीव्ही कसा लिहावा याविषयी माहिती दिली. यावेळी रसायनशास्त्रातील विभागप्रमुख डॉ. गोकावी, डॉ. डी. एस. भांगे यांनीही मार्गदर्शन केले. ऋतूजा चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. गरडकर, प्रा. अनभुले, प्रा. हंगीरगेकर, प्रा. शर्मा, डॉ. तायडे उपस्थित होते.

तरूण भारत

# नॅक मूल्यांकनासाठी विद्यापीठात जय्यत तयारी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन करण्यासाठी १५ ते १७ मार्च दरम्यान बेंगलोरची नॅक पिअर कमिटी विद्यापीठात येणार आहे. त्या दृष्टीने अधिविभागांनी नॅकसाठी तयार केलेला लेखी अहवाल व ऑनलाईन प्रेजेंटेशन, पाहून पूरक सूचना करण्याचे काम विद्यापीठ प्रशासनाकडून सुरू आहे. तसेच ज्या अधिविभागांनी उत्कृष्ट अहवाल केले आहेत, त्यांचे कौतुकदेखील केले जात आहे. एकूणच नॅक मूल्यांकनाच्या दृष्टीने विद्यापीठाची जय्यत तयारी सुरू आहे.

नॅक कमिटी विद्यापीठात आल्यानंतर कमिटीतील सदस्यांच्या राहण्याची, भोजणाची सुविधा, प्रेजेंटेशन कोणी करायचे, प्रश्नांची उत्तरे कोणी द्यायची यासह अन्य कामांसाठी समित्या नेमण्यात आल्या आहेत. या समित्यांना कामांची जबाबदारी सोपवली आहे. प्रत्येकाने आपआपली जबाबदारी कशी पार पाडायची यासंदर्भात सूचनाही दिल्या जात आहेत.



- **१५ ते १७ मार्च दरम्यान बेंगलोरची नॅक पिअर कमिटी करणार मूल्यांकन**

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे प्रत्येक विभागात जावून पाहणी करीत आहेत. यंदा इमारतींची रंगरंगोटी करण्यापेक्षा गुणवत्तेला विद्यापीठाने अधिक महत्व दिले असून नॅक मुल्यांकनाची तयारी केली आहे.

सकाळ

# कौशल्याबाबत उद्यापासून कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, ओपेक्स अ‍ॅस्लेटरतर्फे शुक्रवारी (ता. ५) 'लीडरशिप स्कील' आणि शनिवारी (ता. ६) 'कॉम्प्टेन्स बिल्डिंग स्कील' यावर ऑनलाईन कार्यशाळा होत आहेत. उद्‌घाटन संचालक डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, सचिन कुंभोजे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यशाळेत सुमारे दहा हजारांहून अधिक शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक सहभागी होणार आहेत. विनय गोसावी, अकिल बाहेती, विजेश तलावाडेकर, डॉ. गणेश राव, विशाल पिझांनी, प्रभात सिंह, विश्वजित काशीद व्याख्याते असतील. डॉ. डी. टी. गायकवाड मुख्य समन्वयक आहेत.